

कासावली : द्वितीय विभागीय फुटबॉल स्पर्धेत रविवारी बिट्स पिलानी व चिखली स्पोर्टस क्लब यांच्यात झालेल्या सामन्याचा क्षण.

# द्वितीय विभागीय फुटबॉलमध्ये बिट्स पिलानीची चिखलीवर मात

पणजी (क्रीडा प्रतिनिधी) : गोवा फुटबॉल असोसिएशनच्या द्वितीय विभागीय (मुरगाव गट) फुटबॉल स्पर्धेत सांकवाळच्या बिट्स पिलानी संघाने चिखली स्पोर्टस क्लबवर ३-० फरकाने मात केली. सामना रविवारी कासावली येथील डॉ. टी. बी. कुन्हा क्रीडा संकुल मैदानावर झाला. गुरदैन मदान याने पेनल्टी फटक्यावर बिट्स पिलानीचा पहिला गोल केला. त्यानंतर नील भंडारी व पूनेश बाबू यांनी प्रत्येकी एक गोल नोंदवून बिट्स पिलानीच्या विजयावर शिक्कामोर्तब केले.

Scanned by CamScanner